|| श्री गणेशाय नमः ||

Astro • Puja • Vastu

# हरी ॐ धार्मिक पूजा विधी केंद्र

## ज्योतिष आणि वास्तु सल्लागार


योगेशशास्त्री ढवळे (गुरुजी)
Mob. 95944 28749

निलेशशास्त्री ढवळे (गुरुजी)
Mob. 86524 02078



॥ श्री ॥

# संतोषी माता

## पूजा, व्रत, कथा

# माहात्म्य

## शुक्रवारची कहाणी

"मिलिंद माधव"

ताडदेव बुक डेपो प्रकाशन
ताडदेव, मुंबई - ४०० ००७.

## श्री संतोषीमातेचे व्रत करताना पुढील गोष्टी आचरणात आणाव्या

१. व्रत करणाऱ्या माणसाने, स्त्री–पुरुषानें, पति-पत्नीने मनाने व शरीराने पवित्र, शुद्ध व स्वच्छ राहावे.

२. व्रताला प्रथम सुरवात शुक्रवारी करावी.

३. व्रताच्या दिवशी पूर्ण दिवस उपवास करावा. ज्याना असा उपवास झेपणार नसेल त्याने पूजा झाल्यानंतर एकवेळ जेवावे. जेवताना प्यावयाच्या पाण्याशिवाय नंतर पाणीसुद्धा पिऊ नये.

४. शुक्रवारची संतोषी देवीची पूजा करताना, कथा ऐकताना मनाने आनंदी राहावे.

५. व्रत करताना घरांतल्या सर्व मंडळींनी एकोप्याने व आनंदानें राहावे. भांडणतंटा वगैरे करू नये.

६. या व्रतकथेच्या श्रवणाचा लाभ आप्त-इष्ट-मित्र, शेजारी-पाजारी यानाही घेऊं द्यावा.

७. अडचण असेल अगर शारीरिकदृष्ट्या स्वतः व्रत करणे शक्य नसेल तर ते आपल्या-साठी दुसऱ्याकडून करवावे. किंवा अडचणीचे दिवस टळल्यानंतर येणाऱ्या शुक्रवारी करावे. व्रत अर्ध्यावर सोडू नये.

८. एकादशी शिवरात्री वगैरे उपासाचा दिवस असल्यास फक्त गुळाचाच प्रसाद करावा.

९. प्रसादासाठी गूळ व भाजलेले साधे हरभरे (चणे) घ्यावे. चणे मसालेदार अगर खारे, काबुली वगैरे दुसरे कसले असू नयेत.

१०. व्रताच्या दिवशी कोणतीही आंबट वस्तू, कोकम (आमसुले), लिंबू, दही, ताक, वगैरे जिन्नस व्रत करणाराने खाऊ नयेत. तसेच व्रतासाठी जेवायला बोलावलेल्याना खाऊ घालू नयेत. जेवणांत वापरूं नये.

११. तीन शुक्रवारानंतर येणाऱ्या चौथ्या शुक्रवारी एका ब्राह्मणाला श्रद्धापूर्वक भोजनास बोलवावे. किंवा एक कुमार व एक कुमारी अशा दोन लहान मुलांना जेवायला बोलवावे.

१२. व्रत अखंड चार महिने करावे. किंवा इच्छित कार्य पूर्ण होईपर्यंत करावे. शेवटच्या शुक्रवारी उद्यापन करावें.
(अशारीतीने व्रताची सांगता करावी)

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

व्रत, उपास करता न येणाऱ्या स्त्रियांनी व पुरुषांनीं दर शुक्रवारी या पुस्तकांतील "श्रीसंतोषी देवीची कहाणी व श्रीसंतोषी देवी माहात्म्य" वाचावे.

## * * * * * * * * * श्री संतोषी देवीची मंदिरे * * * * * * * * *

१. नळबाजार, मारुतीचे देवळांत.
लादीबाजार–डंकन रोड, मुंबई नं. ४

२. आग्रा रोड, मुलुंड
मुंबई नं. ८०



## श्री संतोषीमातेच्या पूजेच्यावेळी करावयाची रचना

पुस्तकात दिलेला संतोषी मातेचा रंगीत फोटो काढून घ्यावा. फ्रेम करून अगर पुठ्ठ्यावर चिकटवून तो चौरंगावर किंवा पाटावर मांडावा. त्याच्यासमोर निरांजनात तूपवात लावावी. सुगंधी उदबत्त्या लावाव्या. शेंडी व पाणी असलेला नारळ समोर ठेवावा. तसेंच एक विडा ठेवावा. (देठाची पाने २ एक पैसा व एक सुपारी) एक खारीक व एक बदाम ठेवावा. कलशात (तांब्याचा तांब्या) पाणी भरून ठेवावे. त्यावर एक आंब्याचा डहाळा घालावा. त्यावर ताटात किंवा ताम्हनात गूळ व भाजलेले चणे प्रसाद म्हणून ठेवावे. सर्व पूजा–विधी आटोपल्या-नंतर कलशातील पाणी तीर्थ म्हणून व गूळ–चणे प्रसाद म्हणून जमलेल्या सर्व मंडळीस वाटावे, कलशातील बाकी पाणी घरात सगळीकडे शिंपडावे व राहिलेले पाणी तुळशीला घालावे.

सकाळी आंघोळ करून स्वच्छ धुतलेले वस्त्र नेसून पूजेला बसावे. सकाळी साधत नसेल तर संध्याकाळी पुन्हा आंघोळ करून स्वच्छ धुतलेले वस्त्र नेसून पूजेला बसावे.

श्रीसंतोषी मातेची भावभक्तीने, यथामति, यथाशक्ति पूजा करावी. पूजेनंतर सोबत दिलेली संतोषी मातेची कथा व माहात्म्य भक्तियुक्त अंतःकरणाने वाचावे. कथा व पोथी वाचून झाल्या-नंतर हातात गूळ व चणे घेऊन महालक्ष्मी संतोषीमातेची पुढील प्रमाणे प्रार्थना करावी.

"हे माते महालक्ष्मी, भगवती तूं आदिमाया आहेस. जगत्पित्या महाविष्णूची पत्नी आहेस, तुला आदि-अंत नाही. सृष्टीची उलथापालथ तुझ्यामुळेंच होत आहे. तूं आहेस तर जीवन

आहे. तुझी कीर्ति मी पामर काय गाणार ? हे विष्णुपत्नी महामाये तूं मला प्रसन्न हो. मी तुझा दीन–दास ( तुझी दीन दासी ) प्रार्थना करीत आहे. तुझी विनवणी करीत आहे. तुझा कृपाप्रसाद मागत आहे. मला आशीर्वाद दे. माझी इच्छा पूर्ण कर. ”

नंतर व्रत करणाऱ्याने आपली इच्छा संतोषीमातेला सांगावी. नंतर हातातील गूळ व चणे गाईला घालण्यासाठी बाजूला ठेवावे. नंतर ते गाईला खाऊ घालावे. प्रार्थना झाल्यानंतर संतोषी मातेची आरती करावी. आरती झाल्यानंतर तीर्थ-प्रसाद वाटावा. आपणही घ्यावा. नंतर शक्य असल्यास जमलेल्या बायकांनी संतोषी मातेची भजने वगैरे म्हणावीत. दिवस आनंदात घालवावा.

उद्यापनाच्या दिवशी यथाशक्ति व्रताचे उद्यापन करावे. पांच पैसे, पंचवीस पैसे, सव्वा रुपया याप्रमाणे सव्वा पटीतल्या किंमतीचे भाजलेले चणे व गूळ आणून त्याचा प्रसाद करावा. घरांतील सर्व मंडळींनी संतोषी मातेची प्रार्थना करून नमस्कार करावा व गूळ–चण्याचा प्रसाद भक्षण करावा. खीरपुरीचें जेवण करावें. जेवणांत हरभऱ्याची ( चण्याची ) भाजी अवश्य असावी. जेवणात कोणतीही आंबट वस्तू वापरू नये. लहान आठ मुलांना ( कुमार-कुमारी ) जेवायला बोलवावे. जेवणानंतर दक्षिणा म्हणून प्रत्येकास एकादे गोड फळ किंवा खारीक, बदाम द्यावा. रोख पैसे देऊं नयेत.

व्रत मनोभावे आचरून उद्यापन केल्यावर महालक्ष्मी संतोषीमाता प्रसन्न होईल.



## शुक्रवारची कहाणी. श्रीसंतोषीदेवीची कथा.

शांताकारं भुजगशयनं पद्मनाभं सुरेशम् । विश्वाधारं गगनसदृशं मेघवर्णं शुभांगम् ।
लक्ष्मीकांतं कमलनयनं योगिभिर्ध्यानगम्यम् । वंदे विष्णुं भवभयहरं सर्वलोकैकनाथम् ॥

एका नगरांत एक म्हातारी राहात होती. तिला सात मुलगे होते. त्या सर्वांची लग्नें झाली होती. सात सुना घरांत नांदत होत्या. सर्वजण एका ठिकाणीच राहात. सहा मुलगे चांगल्या कामधंद्यावर होते. ते खूप पैसे मिळवीत. सातव्याला कामधंदा नव्हता. त्याला मिळकत नव्हती. म्हातारी आपल्या सहा मुलांना चांगले चांगले पदार्थ करून घालायची. सातव्याला उरले सुरलेले द्यायची. तो साधाभोळा होता. त्याला वाटायचे आपल्यावर आईचे खूप प्रेम आहे.

एका सणाला म्हातारीने लाडू केले. सहा मुलांची जेवणे झाली. त्यांच्या पानांतील उरल्या सुरल्या चुऱ्यांचा म्हातारीने एक मोठा लाडू केला. तो सातव्याला वाढला. त्याला ही गोष्ट आपल्या बायकोकडून कळली. त्याला फार वाईट वाटले. रागही आला. त्याने घर सोडून जायचे ठरविले. कोठेतरी कामधंदा मिळवून खूप पैसे कमवूनच घरी यायचे असा त्याने विचार केला.

आईचा निरोप घेऊन तो निघाला. आईनेही त्याला अडविले नाही. तो कपडेलत्ते घेऊन बायकोचा निरोप घ्यायला गेला. त्यावेळी त्याची बायको शेणाच्या गोवऱ्या लिंपीत होती. तिला अशीच कामे करावी लागत. निरोप घेतेवेळी त्यानें बायकोला आठवण म्हणून बोटातली आंगठी

काढून दिली. तो बायकोजवळ आठवणीसाठी कांहीं मागू लागला. ती म्हणाली, माझ्याजवळ देण्यासारखे कांहींच नाही. पण हीच माझी आठवण ! असे म्हणून तिने त्याच्या वस्त्रावर आपला शेणाने भरलेला हात टेकला. तीच आठवण समजून तो प्रेमाने बायकोचा निरोप घेऊन निघाला.

तो प्रवास करीत करीत एका मोठ्या शहरात गेला. तेथें एका व्यापाऱ्याकडे तो नोकरीस राहिला. तो आपले काम कसोसीने करी. अतिशय प्रामाणिकपणे वागे. मालक त्याच्यावर फार खूष असे. पुढे मालकाने त्याला आपला भागीदार करून घेतले. अशी बारा वर्षे गेली. मालकाला मूलबाळ नव्हते. मालकाने सर्व व्यापार त्याला दिला. व आपण तीर्थयात्रेला निघून गेला.

इकडे घरी त्याची बायको होती. तिला पहिल्यापासून कष्टाचीच कामे करावी लागत. आता तर जवळ नवरा नाही. आतां तिला घरात फारच त्रास होऊ लागला. घरातली कष्टाची कामे करायची, रानांत जाऊन लाकडाची मोळी आणायची. पण तिला खाणे जेवणेही चांगले मिळत नसे. कोंड्याची भाकरी, उरलेले शिळेपाके अन्न तिच्या वाट्याला यायचे. पण ती पतिव्रता होती. घरांत कितीही त्रास झाला तरी ती घर सोडून कोठे गेली नाही. आज ना उद्यां आपला नवरा येईल. मग आपल्याला सुख मिळेल या आशेवर ती राहायची. तिच्या जावा तिला उणे-दुणे बोलायच्या. पण ती मनावरच घेत नसे. नवऱ्याची आठवण काढून रडायची. त्याला सुखी ठेवून सुखरूप परत आणण्याबद्दल देवाची प्रार्थना करायची.

एकदा ती रानांत लाकडे आणण्यासाठी गेली होती. येताना तिने एका घरी कांही बाया



कांही व्रत करीत असतांना दिसल्या. ती तेथे थांबली. तिने त्या बायांना विचारले, तुम्ही कोणते व्रत करता ? कोणत्या देवीची पूजा करता ? त्याने काय होते ?

त्यातील एका स्त्रीने तिला "संतोषी मातेचे व्रत" सांगितले. सर्व माहिती दिली आणि ती म्हणाली " बाई हें व्रत केल्याने दुःख दारिद्य नाहींसे होते. आपल्या मनांतील इच्छा पूर्ण होतात. घरांत लक्ष्मी येते. आवडता माणूस परदेशी गेला असेल तर लवकर सुखरूप परत येतो, कोर्ट कचेरीचे निकाल आपल्या बाजूने लागतात. नोकरी धंदा नसणाराला तो मिळतो. लग्न होत नसेल तर लग्न होते. मनपसंत नवरा मिळतो. मुले नसतील त्याला मुलें होतात. संतोषीमातेच्या व्रताने मनांतील सर्व इच्छा पूर्ण होतात."

ती म्हणाली, असे जर आहे तर हे संतोषीमातेचे व्रत कसे करायचे तें सांगा. पण मी गरीब आहे.

तेव्हा ती बाई म्हणाली, बाई हें व्रत गरिबापासून श्रीमंतापर्यंत सर्वांना करता येण्यासारखे आहे. ज्याने त्याने आपल्या ऐपतीप्रमाणे हें व्रत करावे. देवाजवळ गरीब-श्रीमंत असा भेद भाव नसतो. मात्र आपली पूर्ण श्रद्धा असली पाहिजे. संतोषीमातेचे व्रत करणाराने शुक्रवारच्या दिवशी श्रीसंतोषीमातेची मनोभावे पूजा करावी. दीप लावावा, धूप दाखवावा, गूळ व भाजलेले चणे याचा नैवेद्य दाखवावा. मनोभावे प्रार्थना करावी. दिवसभर उपास करावा, पूजा केल्या-नंतर संध्याकाळी एक वेळ जेवावे. जेवणात आंबट पदार्थ बिलकूल असता नये. हरभऱ्याची

(चण्याची) भाजी अवश्य असावी. असे चार महिने करावे. शेवटच्या शुक्रवारी व्रताचे उद्यापन करावे. प्रसादास चणे व गूळ हा सव्वा आणा, सव्वा रुपया या प्रमाणे सव्वा प्रमाणात असावा. उद्यापनाच्या दिवशीं ८ मुलांना जेवण घालावे. मात्र आंबट पदार्थ जेवणाखाण्यात असता कामा नये. 

लगेच तिने मनांत संकल्प केला, मी हे व्रत करीन. पहिल्याच शुक्रवारी रानात जाऊन तिने लाकडाची मोळी आणली ती विकली. सव्वा आण्याचे गूळ चणे तिने विकत घेतले. दुसरे साहित्य जमा केले. ती आंघोळ करून संतोषी मातेच्या देवळात गेली. तिने आणलेल्या साहित्याने श्रद्धापूर्वक संतोषी मातेची पूजा केली. मनोभावे प्रार्थना केली. त्या दिवशी उपास केला. याप्रमाणें ती दर शुक्रवारी करू लागली.

इकडे तिचा नवरा व्यापारधंदा करीत होता तो जवळ जवळ घरची आठवणच विसरला होता. त्याच्या स्वप्नात संतोषीमाता गेली. त्याला म्हणाली, "आज बारा वर्षें झाली. तुझी पतिव्रता बायको तिकडे तुझ्या आठवणीने झुरत आहे. डोळ्यात प्राण आणून तुझी वाट बघते आहे; दीर, जावा तिचा छळ करताहेत. दिवसरात्र ती कष्ट करीत आहे आणि तूं इकडे मजा करतो आहेस. जा तिची विचारपूस कर, तिला जाऊन भेट. तेथें एका ठिकाणी तुम्ही दोघे सुखाने रहा."

सकाळी उठल्यावर त्याने आंघोळ करून संतोषीमातेची मनोभावे पूजा केली, प्रार्थना केली त्या दिवसापासून त्याने आपल्या व्यवहारातली देणी घेणी पुरी करण्यास सुरवात केली. लवकरच सर्व व्यवहार पूर्ण झाले. त्याने आपली सर्व संपत्ती गोळा केली. तो आपल्या घरी जाण्यास

निघाला. तो आपल्या गावाजवळ आला. त्या दिवशी त्याची पत्नी नेहमीप्रमाणे मोळी घेऊन भरदुपारी घरी येतांना श्रीसंतोषी देवीच्या देवळात गेली. तिने प्रेमभावनेने देवीला नमस्कार केला. ती म्हणाली देवी, माते! माझा पती मला कधी भेटेल? देवी म्हणाली, आजच तुझा पती तुला भेटेल. आता मी सांगते असे कर. तुझी मोळी सोड. तिच्या सारख्या ३ मोळ्या कर. एक माझ्या मंदिराजवळ ठेव. दुसरी नदीकिनाऱ्यावर ठेव आणि तिसरी मोळी डोक्यावर घे. ती मोळी पाहून तुझ्या नवऱ्याला जेवण करण्याची इच्छा होईल. तो तुझ्याकडून ती मोळी विकत घेईल. जेवण करील आणि नंतर घरी जाईल. मग तू माझ्या मंदिराजवळची मोळी घेऊन घरी जा. अंगणात मोळी टाकून मोठ्याने म्हण "सासूबाई, सासूबाई, ही लाकडे घ्या आणि मला कोंड्याची भाकर आणि करवंटीत पाणी द्या. पण आज घरी पाहुणे कोण आले आहेत?" तिने त्याप्रमाणे केले. तिच्या नवऱ्याने तिच्या जवळूनच मोळी विकत घेऊन जेवण केले. 

मंदिराजवळची मोळी घेऊन ती घरी गेली. तिच्या अगोदरच तिचा नवरा घरी आला होता. आईबरोबर त्याच्या गप्पा गोष्टी चालल्या होत्या इतक्यात अंगणात त्याची बायको मोळी घेऊन आली मोळी अंगणात टाकून देवीच्या सांगण्याप्रमाणे ती मोठ्याने म्हणाली, "सासूबाई, सासूबाई ही लाकडे घ्या आणि मला कोंड्याची भाकर व करवंटीत पाणी द्या. पण आज घरी पाहुणे कोण आले आहेत?"

बायकोचा आवाज नवऱ्याने ओळखला. तो बाहेर आला. पाहातो तो आपण जिच्या जवळून मोळी विकत घेतली ती ! तिच्या उजव्या हाताच्या बोटात आपण दिलेली खुणेची आंगठी पण दिसली. तो बायकोला भेटला. तो म्हणाला, देवीने सांगितले ते खरे, येथे तर तुझे या लोकांनी हाल चालवले आहेत. त्या वेळेपासून घरातच निराळ्या जागेत ती दोघेजणे स्वतंत्र राहू लागली. इतक्यात शुक्रवार आला. नवऱ्याच्या परवानगीने तिने त्या शुक्रवारी श्रीसंतोषी-मातेची पूजा करून व्रताचे उद्यापन केले. जावांच्या मुलांना व शेजारच्या नातेवाईकांच्या मुलांना तिने जेवायला घातले. सर्व गोष्टी आनंदात पार पडल्या पण जातांना जावांच्या मुलांनीं तिच्या जवळून पैसे मागून घेतले. तिने ते दिले. मुलांनी त्या पैशांची आवळे, चिंचा, बोरें, करवंदे घेऊन खाल्लीं, त्यामुळें देवीच्या व्रताचा भंग झाला. देवी कोपली. राजाचे शिपाई आले आणि तिच्या नवऱ्याला पकडून घेऊन गेले. ती रडत रडत संतोषी मातेच्या देवळात गेली. नमस्कार करून कळवळून ती मातेला म्हणाली, " माते, तू हे काय केलेस ? आधी मला हंसवलेस आणि आतां का रडवतेस ? माते माझ्यावर कृपा कर ! "

देवी म्हणाली, " मुली, मुलांनी आंबट वस्तू खाल्ल्यामुळे माझ्या व्रताचा भंग झाला आहे. तूं मुद्दाम काही केले नाहीस. आता घरी जा व पुन्हा उद्यापन कर. आता चूक करू नको, सर्व कांही चांगले होईल. "



ती आनंदाने घरी निघाली. वाटेतच तिचा नवरा तिला भेटला. तो म्हणाला, ' मी संपत्ती मिळवून आणली त्याचा कर सरकारात भरला नव्हता. त्यासाठी मला राजदरबारात बोलावले होते. राजाकडे कर भरूनच आता मी आलो आहे. '

ते ऐकून तिला फार आनंद झाला. ती दोघें आनंदाने घरी आली. येत्या शुक्रवारीच त्यांनी उद्यापनाची तयारी केली. मुलांना जेवायला बोलावलें. मुलें म्हणाली, आम्हाला काही आंबट खायला घालशील किंवा पैसे देशील तर आम्ही येतो नाहीतर नाही.

ती म्हणाली, आंबट चिंबट कांही मिळणार नाही. जेवायला यायचे तर या नाही तर येऊ नका. मुलें कांही गेलीं नाहीत. तिने ब्राह्मणांना बोलावून आणले. आनंदाने जेवायला घातले. थाटामाटानें व्रताचे उद्यापन केले. उद्यापन यथासांग पार पडले. देवी तिला प्रसन्न झाली. गाई, म्हशी, शेतीवाडी, लक्ष्मीने घर भरले. तिला एक सुंदर मुलगाही झाला.

एक दिवस देवीच्या मनांत आले आपण हिच्या घरी जावे. हिची सासू, दीर, जावा कशा आहेत ते पहावे. देवीने अक्राळ-विक्राळ रूप घेतले. काळाकुट्ट रंग, चपटे नाक, बटबटीत डोळे, मोठे जाड रुंद ओठ, स्थूल शरीर, कपड्याच्या चिंध्या. अशा रूपाने देवी अंगणात आली. सासूने पाहिले. ती मोठमोठ्याने ओरडू लागली. " धावा, धावा मुलांनो धावा ! कोणी पिशाच्च,

डाकीण घरात येत आहे!" असे बोलून तिची बोबडीच वळली. ओरडा ऐकून मुलें धावत आलीं पण तशा रूपात देवीला पाहून तीं घाबरून गेलीं. इतक्यात धाकट्या सुनेनें देवीला पाहिले. तिने ओळखले! ही तर माझी संतोषीमाता! ती आनंदाने नाचत धावत अंगणात गेली. देवीला नमस्कार केला, तिच्या पायावर डोके ठेवले. हात धरून घरात आणले. मानाने पाटावर बसवले. मनोभावे पूजा प्रार्थना केली. गूळ चण्यांचा नैवेद्य दाखवला. संतोषीमातेने सुंदर रूप घेतले.

आता घरातली सर्वजणे तेथे जमली. संतोषीमातेच्या पायावर डोके ठेऊन तिला नमस्कार केला. माते, आम्ही चुकलो. आम्ही पापी आहोत, अज्ञानी आहोत, आम्हाला क्षमा कर. सर्वांनी प्रार्थना केली. संतोषीमाता प्रसन्न झाली. सर्वांना आशीर्वाद देऊन देवी गुप्त झाली. ज्याप्रमाणे त्या सुनेला श्री संतोषीमातेने सुखी केले तसेच हे व्रत करणारांना, कहाणी ऐकणारांना, सर्वांना संतोषीमाता सुखी करो. शुभं भवतु.

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

श्रीसंतोषीमातेचे व्रत व उपास ज्याना करणे शक्य नसेल त्यांनी वरील श्रीसंतोषीमातेची कथा व पुढील श्रीसंतोषीमातेचे माहात्म्य दर शुक्रवारी भक्तिभावनेनें वाचावे म्हणजे श्रीसंतोषीमाता संकटें नाहिशी करून मनीची इच्छा पूर्ण करील.

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *



## ॥ श्रीसंतोषीदेवी माहात्म्य ॥

ॐ नमो श्रीगजवदना। गणराया गौरीनंदना। विघ्नेशा भवभयहरणा। नमन माझें साष्टांगीं ॥१॥ नंतर नमिली श्रीसरस्वती। जगन्माता भगवती। ब्रह्मकुमारी वीणावती। विद्यादाती विश्वाची ॥२॥ नमन तैसें गुरुवर्या। सुखनिधान सद्गुरुराया। स्मरुनी त्या पवित्र पायां। चित्तशुद्धी जाहली ॥३॥ थोर महात्मे संतजन। बुधगण आणि सज्जन। करुनी तयांसी नमन। ग्रंथरचना आरंभिली ॥४॥ धन्य धन्य श्रीसंतोषीमाता। तिची ही अलौकिक व्रतकथा। शुक्रवारीं वाचितां ऐकतां। इच्छापूर्ती होतसे ॥५॥ संतोषीदेवी जगन्माता। तिच्या चरणीं ठेवुनी माथा। नम्रभावें शरण जातां। भक्तां प्रसन्न होतसे ॥६॥ तिची कृपादृष्टि होतां। द्रव्यलाभ होतो तत्त्वता। उपास व्रत आचरितां। इच्छित फळ लाभतें ॥७॥ आधीं करुनी शुद्ध मन। देवीसी करावें वंदन। आणि करावी कथा श्रवण। मनोभावें सर्वांनीं ॥८॥ एके काळीं एका नगरीं। राहात

होती एक म्हातारी । सात पुत्र सात सुना घरीं । नातू होते अनेक ॥ ९ ॥ सातांपैकीं सहा सुना । सासूच्या आवडत्या जाणा । कारण त्यांच्या नवऱ्यांना । द्रव्य खूप मिळतसे ॥ १० ॥ सातवा मुलगा बेकार । सातवी सून वाटे भार । नावडती होती फार । कुटुंबांत सर्वांची ॥ ११ ॥ सहा मुलगे सहा सुना । सुग्रास भोजन फक्त त्यांना । सातवा पुत्र-सून या दोघांना । शिळेंपाकें मिळतसे ॥ १२ ॥ ज्यांची असे चलती । त्यांना सगळे वाखाणती । गरिबांना दूर लोटिती । न्याय हाच जगाचा ॥१३॥ असा जरी प्रकार होता । तरी सातवी सून पतिव्रता । रात्रंदिन सर्वांकरितां । कष्ट करी बिचारी ॥ १४ ॥ बसावें घराच्या बाहेरी । भुकेला कोंड्याची भाकरी । पाणी मिळे त्यावरी । फुटक्या करवंटीतुनी ॥ १५ ॥ घरातील त्या प्रकाराला । सातवा पुत्र कंटाळला । जावें म्हणे देशांतराला । निरोप घेऊनी पत्नीचा ॥ १६ ॥ मग तो भेटला पत्नीला । मनींचा विचार सांगितला । तिनेंही रुकार दिधला । आपुल्या पतीच्या



इच्छेला ॥ १७ ॥ आणि मग धीर करून । मागितली तिनें प्रेमाची खूण । जेणें होईल नित्य स्मरण । अपुल्या प्रिय पतीचें ॥ १८ ॥ पतीनें आपल्या बोटातली । सुवर्णमुद्रिका काढिली । आनंदानें तिला दिली । तेव्हां ती आनंदली ॥ १९ ॥ तो म्हणे आतां तूंही । तुझी खूण द्यावी कांहीं । जेणें मला होणार नाहीं । दुःख तुझ्या विरहाचें ॥ २० ॥ तिच्यापाशीं कांहीं नव्हतें । हाताला शेण लागले होतें । पतीच्या छातीस लाविलें तें । तेव्हां पती निघाला ॥ २१ ॥ जातां जातां एका गावीं । बाजारपेठ दिसली नवी । म्हणे नोकरी शोधावी । आतां याच ठिकाणीं ॥ २२ ॥ एक होता मोठा दुकानदार । तयासी केला नमस्कार । द्यावा कांहीं रोजगार । ऐसी केली विनंती ॥ २३ ॥ त्याची दीन दशा पाहुनी । दया उपजली शेठजी मनीं । त्यानीं आपल्या दुकानीं । नोकरी दिली तयाला ॥ २४ ॥ त्यानें रोज सकाळीं उठावें । मालका आधीं दुकानीं जावें । कामधाम सारें करावें । इमानानें सर्वदा ॥ २५ ॥ कामें करुनी

दिलेलीं। मालकाची मर्जी संपादिली। आणि दौलत मिळविली। बरीचशी तयानें ॥ २६ ॥ मग पुढें काय झालें। तें दुकान त्यालाच मिळालें। कारण मालक गेले। तीर्थाटन करावया ॥२७॥ इकडे त्याची सुशील भार्या। करीत होती अपुल्या कार्या। नित्यनेमाने वागाया। चुकली नाही कधींही ॥२८॥ सर्वांनी हडहड करावें। वाटेल तें टोचून बोलावें। परीं तें सहन करावें। निमूटपणें सर्वही ॥२९॥ रोज पहाटे उठावें। दगडकाटे तुडवीत रानीं जावें। लाकूडफाटा घेऊन घरीं यावें। घामाघूम होऊनी ॥३०॥ असेंच होतें चाललें। परी एकदां दृश्य आगळें। रानांत तिला दिसलें। तेव्हां तेथें थांबली ॥३१॥ एका मोठ्या झाडाखालीं। जमली होती स्त्रीमंडळी। त्यांची तेथें होती चालली। देवीची एक महापूजा ॥ ३२ ॥ सातव्या सुनेने विचारिलें। भगिनीनो हें व्रत कसलें। कृपा करूनी सांगा सगळें। उपकार तुमचे होतील ॥३३॥ मी आहे गरीब अडाणी। खरीच अभागी या जनीं। अपुली भगिनी समजुनी। मला सर्व सांगावें ॥३४॥ त्या स्त्रियांना दया आली। त्यांनी तिला



जवळ बसविली। आणि प्रेमानें सांगितली। व्रतकथा आणि पूजाविधी।३५। म्हणाल्या हें व्रत आहे महत्वाचें। महालक्ष्मी संतोषी देवीचें। श्रद्धेनें आचरतील तयांचें। कल्याण होतें सर्वदा॥ ३६ ॥शुक्रवारी करावें उपोषण। देवीचें करावें पूजन। स्तोत्र–माहात्म्य पठण। किंवा श्रवण करावें ॥ ३७ ॥ आपला हेतु देवीस सांगावा। गूळचण्याचा नैवेद्य दाखवावा। आंबट पदार्थ न खावा। स्वतः मात्र त्या दिवशीं ॥ ३८ ॥ कार्यसिद्धी होईपर्यंत। श्रद्धेनें करावें हें व्रत। सुमारे चार महिन्यांत। मनोरथ पूर्ण होतील ॥३९॥ अडचणीच्या दिवसांत। दुसऱ्याकडुनी करवावें व्रत। आणि आपण चित्तांत। संतोषी माता स्मरावी ॥ ४० ॥ प्रत्येक चवथ्या शुक्रवारीं। एक ब्राह्मण बोलावुनी घरीं। भोजनीं द्यावी खीरपुरी। यथाशक्ती दक्षिणा ॥ ४१ ॥ मनोरथ होतां पूर्ण। व्रताचें करावें उद्यापन। आठ मुलांसी भोजन। द्यावें खीरपुरीचें ॥ ४२ ॥ खिरीसाठीं जिन्नस समस्त। घ्यावे सवा सवा प्रमाणांत। चण्याची भाजी भोजनांत। अवश्य मात्र

असावी ॥ ४३ ॥ फळें खारका बदाम द्यावे । दक्षिणा म्हणूनी मुलांसी द्यावे । असें यथासांग करावें । व्रत हे संतोषीमातेचें ॥ ४४ ॥ ऐसें करतां व्रत पालन । संतोषीदेवी होते प्रसन्न । दुःख, दारिद्र्य आणि दैन्य । निश्चयें नष्ट होतसे ॥ ४५ ॥ लक्ष्मीनें घर भरतें । मनासारखें सर्व होतें । आयुरारोग्यही लाभतें । चिंता क्लेश जाऊनी ॥ ४६ ॥ पतिविरह टळतो । सौभाग्यरवि तळपतो । कुमारिकेचा विवाह होतो । मनपसंत वराशीं ॥ ४७ ॥ प्रियजनांच्या होती भेटी । मिटतात सर्वही कटकटी । सुवासिनींच्या पोटीं । पुत्ररत्नें जन्मती ॥ ४८ ॥ ऐसी ऐकुनी व्रतकथा । संतोषली साध्वी पतिव्रता । म्हणे मीही असें आतां । व्रत देवीचे करीन ॥ ४९ ॥ देवीस केला नमस्कार । स्त्रियांचे मानिले आभार । आणि आपण सत्वर । उद्योगाला निघाली ॥ ५० ॥ पुढें आला शुक्रवार । आठवला व्रतविचार । करुनी पूजेचा निर्धार । उपास तिनें पाळिला ॥ ५१ ॥ भल्या पहाटे केलें स्नान । संतोषीमातेची तसबीर छान । समोर ठेवुनी केलें पूजन ।



सर्व पंचोपचारांनी ॥ ५२ ॥ नैवेद्याला गूळचणे । ठेविले तिनें भक्तीनें । आरती करुनी नम्रपणें । प्रार्थना केली मनांत ॥ ५३ ॥ जय जय देवी संतोषीमाते । तव चरणीं लोटांगण घालितें । ठेवी मस्तकीं वरद हस्त ते । कृपा असो सर्वदा ॥ ५४ ॥ हे माते तूं महालक्ष्मी । वससी सर्व स्थूलसूक्ष्मीं । काय सांगावें तुजला मी । तूं सर्वही जाणसी ॥ ५५ ॥ व्रतानें तूं संतुष्ट व्हावें । धनधान्य वसन विपुल मिळावें । कुटुंबियांचें कल्याण व्हावें । तुझ्या कृपेनें सर्वदा ॥ ५६ ॥ तूं अससी महा उदार । मी आहे गरीब पामर । भोगिल्या आपत्ती अपार । येई आतां धावुनी ॥ ५७ ॥ तें ऐकुनी देवी संतोषली । त्या साध्वीला प्रसन्न झाली । आशीर्वाद देत म्हणाली । "मुली धन्य धन्य तूं ॥५८॥ तुझे सर्व मनोरथ । पूर्ण होतील त्वरित । भाग्यवती तूं खचित । होशील या भूतलीं " ॥ ५९ ॥ तिकडे तिचा सालस पती । श्रीमंत झाला होता अती । परंतु तयाचे चित्तीं । स्मरण नसे पत्नीचें ॥ ६० ॥ देवी त्याचे

झाली। आणि तीं काकूला म्हणालीं। "जेवण झालें गोड बहू ॥७७॥ आतां कांहीं आंबट दे खायाला। मग रुची येईल तोंडाला। समाधान होईल मनाला। आंबट थोडें खाऊनी"॥७८॥ साध्वी म्हणाली मुलांना। "बाळानों दुसरें कांहीं मागाना। आंबट वर्ज्य आहे उद्यापना। म्हणून आज तें खाऊ नये" ॥ ७९ ॥ मग तिनें दक्षिणा दिली। मुलें सर्व खूष झालीं। आणि धावत धावत गेलीं। जवळच्याच दुकानीं ॥८०॥ चिंचा बोरें विकत घेतलीं। आणि तीं यथेच्छ भक्षिलीं। साध्वीवरी देवी कोपली। व्रतभंग झाल्यामुळें॥८१॥हां हां म्हणतां राजदूत आले। साध्वीच्या पतीला पकडून नेलें। जावा दीर हंसू लागले। 'बरे झालें' म्हणोनी ॥ ८२ ॥ साध्वी भारी दुःखी झाली। संतोषीमातेच्या देवळांत गेली। आणि हंबरडा फोडून म्हणाली। "माते काय केलेंस हें?॥ ८३ ॥ आधीं मला तूं हंसविलें। आतां परी कां रडविलें। सांग तुला का हें शोभलें। आई ना गे तूं माझी"॥ ८४ ॥ देवी म्हणाली त्यावरी।" व्रतभंग झाल्या-



वरी। संकट कोसळतें सत्वरी। यांत नाहीं संदेह"॥८५॥ "मी पाळिले सकल नियम। परी जावा कपटी अधम। त्यांनी करविलें व्रतभंगाचें काम। मुलांकरवीं" ती म्हणे ॥८६॥ "झालें गेलें गंगेला मिळालें। दया करी माते दयाळे। लेकरू समजुनी मला आपुलें। अपराधाची क्षमा करी" ॥८७॥ देवी म्हणाली "यापुढें तरी। व्रतभंगाचें पाप न करी। जा तुझा पती येईल घरीं। सुखरूप चिंता करूं नको"॥८८॥ देवीला करुनी नमस्कार। साध्वीनें गांठिलें अपुलें घर। पतीस पाहून समोर। आनंदली ती मनीं ॥८९॥ पती म्हणे पत्नीला। मी पैसा खूप मिळविला। प्राप्तीकर नव्हता भरला। तो देऊनी आलों मी ॥९०॥ पुढें आला शुक्रवार। साध्वीनें केला उद्यापनाचा विचार। आठ मुलांना साचार। 'जेवायाला या' म्हणे ॥९१॥ मुलें परी महा दुष्ट। त्यानीं धरिला द्वाड हट्ट। 'वस्तू देशील आंबट। तरीच आम्ही येऊ गे' ॥९२॥ तिने सोडला त्यांचा नाद। घातला नाहीं उगीच वाद। व्रतभंगाचा प्रमाद। होऊं दिला नाहीं कीं ॥ ९३ ॥ तिने मग काय केलें। ब्राम्हणासी बोला-

स्वप्नीं गेली । आणि त्याला स्पष्ट म्हणाली । "अरे तुझी पत्नी भोळी । विसरलास कसा तिला? ॥ ६१ ॥ किती सोसिले तिनें हाल । परंतु आतां झाला बदल । तुम्हां दोघांचा भाग्यकाळ । समिप पहा आला असे ॥ ६२ ॥ ऊठ ऊठ सत्वरी आतां । झणीं स्वगृहीं जा मागुता । तेथें तुझी साध्वी कांता । वाट तुझी पहाते" ॥ ६३ ॥ देवी मग अदृश्य झाली । साध्वीच्या पतीला जाग आली । देवीआज्ञा प्रमाण मानिली । आणि गेला स्वग्रामा ॥ ६४ ॥ मिळविलेली अपार संपत्ती । धनधान्याचीं शेंकडों पोतीं । तें सर्व घेऊनी सांगातीं । दारीं येऊनी ठाकला । ॥ ६५ ॥ पूर्वी ज्यांना तो नको होता । तेच धावले त्याच्या स्वागता । म्हणती लोभी माता पिता । 'पुत्र माझा लाडका' ॥ ६६ ॥ आप्त आणि बंधू वहिनी । थक झाले वैभव बघुनी । 'या या' म्हणून सर्वांनीं । लटके प्रेम दाखविलें ॥६७॥ इतक्यांत पत्नी तेथें आली । डोकीवर होती लाकडांची मोळी । ठेवतां ठेवतां ती खालीं । पतिराज तिनें पाहिले ॥ ६८ ॥



लगबगीनें आली धाऊन । पतिचरणीं केलें नमन । आणि आनंदाश्रूसिंचन । करुनी पाय प्रक्षाळिले ॥६९॥ पतीनें परदेशाहून आल्यावरी । संसार थाटला वेगळ्या घरीं । पतिपत्नी परस्परांवरी । प्रीती करती अपार ॥ ७० ॥ काय करावें त्यांचें वर्णन । जोडा जणूं लक्ष्मीनारायण । संतोषीमातेचें स्मरण । दोघें करिती मनांत ॥७१॥ साध्वी म्हणे हे प्राणनाथ । केलें आहे मी संतोषी व्रत । तिच्याच कृपेनें ही समस्त । धनदौलत लाभली ॥ ७२ ॥ आतां करावें उद्यापन । असे आहे माझ्या मनांतून । तरी तयाला आपण । संमती द्यावी सत्वरी ॥ ७३ ॥ पति म्हणे "विचारसी काय यांत । देवी आली होती स्वप्नांत । तिच्याच कृपेनें परत । भेट झाली आपुली ॥ ७४ ॥ तरी न करितां अनमान । त्वरित करावें उद्यापन । हवें असेल तेवढें धन । खर्च करी हे प्रिये" ॥ ७५ ॥ साध्वीने तयारी केली । जावांचीं मुलें जेवणा बोलाविलीं । परंतु त्यांना खोटी बुद्धि शिकविली । त्यांच्या त्यांच्या आयांनीं ॥ ७६ ॥ मुलें पोटभर जेवलीं । आईच्या शब्दांची आठवण

विलें । त्यांनाच जेऊं घातलें । गोड फळें दिली दक्षिणा ॥९४॥ यथासांग व्रत संपलें । उद्यापन पार पडलें । सर्व मनासारखें झालें । संतोषीदेवी संतोषली ॥ ९५ ॥ श्रीलक्ष्मीच्या कृपेनें । कांहीं पडलें नाहीं उणें । पुढें पुत्रलाभ झाल्यानें । आनंदीआनंद जाहला ॥ ९६ ॥ असाच कांहीं काळ गेला । देवीने मनीं विचार केला । म्हणे जाऊनी साध्वीच्या घराला । सर्व प्रत्यक्ष पहावें ॥ ९७ ॥ मग तिने स्वरूप पालटलें । अक्राळविक्राळ सोंग घेतलें । भयाण तोंड बटबटीत डोळे । अंगा येई दुर्गंधी ॥ ९८ ॥ असें तें ध्यान आगळें । साध्वीच्या सासूनें पाहिलें । तिच्या तोंडचें पाणी पळालें । बोबडी वळली भीतीनें ॥ ९९ ॥ 'पळा पळा' म्हणत ओरडली । 'अरे कोणी जखीण आली'। असें म्हणून कडी लाविली । आंतून तिने घराला ॥ १०० ॥ तितक्यांत साध्वी धावत आली । तिला देवीची ओळख पटली । म्हणे ही माझी माय माऊली । प्रत्यक्ष संतोषी माता ही ॥ १०१ ॥ मग तिने दार उघडलें । देवीला घरांत घेतले । सर्वांनीं नाक घांसलें । 'चुकलों चुकलों' म्हणोनी ॥ १०२ ॥



"आम्ही आहों अज्ञ पामर । झाले अमुचे अपराध फार । तूं घाली कृपेची पाखर । क्षमा करी माते तूं ॥१०३॥ देवी म्हणाली सर्वांना । मी पावते मम भक्तांना । श्रद्धा नसे त्या नास्तिकांना । चांगला धडा शिकवितें ॥१०४॥ सर्वांनी केलें वंदन । देवी पावली अंतर्धान । मिलिंदमाधव तिचे चरण । वंदितो सदा सर्वदा ॥ १०५ ॥ संतोषीमातेची कृपा होतां । त्या साध्वीची गेली आपदा । तशीच लाभो सुखसंपदा । तुम्हां आम्हां सर्वांना ॥ १०६ ॥ संतोषीमातेचे सुगम स्तोत्र । आणि तिचें माहात्म्य पवित्र । मिलिंदमाधवानें एकत्र । पोथींत या वर्णिलें ॥ १०७ ॥ श्रावणांतील एका शुक्रवारीं । आठ कुमारिका बोलावुनी घरीं । हळदकुंकू लावुनी वरी । द्यावी एक एक पोथी ही ॥ १०८ ॥ या पोथीचे करावें पारायण । किंवा करावे श्रवण । मग म्हणावे हात जोडून । 'संतोषीमाते नमोस्तुते' ॥१०९ ॥

ॐ शांतिः शांतिः शांतिः

॥ श्रीसंतोषीदेवी माहात्म्य संपूर्ण ॥

# श्रीसंतोषीमातेची प्रासादिक आरती

जय देवी श्रीदेवी संतोषी माते । वंदन माझें भावें तव पदकमलातें ॥ धृ० ॥
श्रीलक्ष्मीदेवी तूं श्रीविष्णुपत्नी । पावसि भक्तालागीं अति सोप्या यत्नीं ॥
जननी विश्वाची तूं जीवनचित्‌शक्ती ।
शरण तुला मी आलों नुरवी आपत्ती ॥ १ ॥ जय देवी ॥
भृगुवारीं श्रद्धेनें उपास तव करिती । आंबट कोणी कांही अन्न न सेवीती ॥
गूळचण्याचा साधा प्रसाद भक्षीती ।
मंगल व्हावे म्हणुनी कथा श्रवण करिती ॥ २ ॥ जय देवी ॥
जे कोणी नरनारी व्रत तव आचरिती । अनन्य भावें तुजला स्मरुनी प्रार्थीती ॥
त्यांच्या हाकेला तूं धावुनिया येसी ।
संतति वैभव कीर्ती धनदौलत देसी ॥ ३ ॥ जय देवी ॥
विश्वाधारे माते प्रसन्न तूं व्हावें । भवभय हरुनी आम्हां सदैव रक्षावें ॥
मनिची इच्छा व्हावी परिपूर्ण सगळी ।
म्हणुनी मिलिंदमाधव आरती ओवाळी ॥ ४ ॥ जय देवी ॥



# संतोषी मातेची प्रार्थना

१

नमस्कार माते संतोषी तुजला, तुझ्याविना शान्ती नसे गे मला ॥ धृ० ॥
तुझी नित्य छाया शिरीं गे असुं दे, तुझ्या चिंतनीं मन माझें हें रमुं दे ॥
तुझ्या दर्शनाची गोडी मनाला ॥ १ ॥
तुझी कृपा मजवर गे असूं दे, तुझ्या चरणावरतीं हें मस्तक नमूं दे ॥
तुझ्या आशीर्वादा मी गे भुकेला ॥ २ ॥

२

धांव माते धांव ग, सन्तोषीमाते धांव ग ।
सद्‌बुद्धि तूं दे आम्हाला, उद्धरून तूं ने आम्हाला
बाळ तुझे गे आम्ही सगळे, आम्हा येऊन पाव ग ।
तुझी कृपा गे झाली ज्यावर उद्धरून ते जाती भूवर
अज्ञानी गे आम्ही माते, ज्ञान मार्ग आम्हां दाव ग ।

३

जगांत नाहीं कुणीं आमुचे, सन्तोषीमातेवीना ॥ धृ० ॥
आई बाप भाऊ बहिणी, मामा काका नच कोणी
तारणार नाहीं जगीं या सन्तोषीमातेविना ॥ १ ॥
जन हें सारे स्वार्थापायीं, फसवणूक करती ठायी ठायी
आधार नाहीं जगांत आतां सन्तोषीमातेविना ॥ २ ॥

४

जगदम्बे माते, संतोषीमाते, तार तूं आतां आम्हांला ॥ धृ० ॥
आम्ही दरिद्री पापी अन्यायी, शरण तुला गे संतोषीमाई
जागा देउनी तव चरणापाशी, पाव तूं आतां आम्हाला ॥ १ ॥
नांव तुझें तें अखंड चित्ती, तेवत राहो हृदयी भक्ती
तुझाच लागो छंद मला, दे बुद्धि तूं आम्हांला ॥ २ ॥

५

चला चला हो चला चला, गीत मातेचें गाउं चला ॥ धृ० ॥
भेदाभेद हा विसरुन जाऊं, एक दिलानें हें गीत गाऊं
माय संतोषी पाहुं चला ॥ १॥



सर्व जिवांचें हीत व्हावया, संतोषीचें नाम स्मरूं या
समुदायाने गाउं चला ॥ २ ॥

६

माय जगदम्बे संतोषीमाते तूंच आतां पाव ना ॥ धृ० ॥
यावे तूं अन् पावन व्हावे, देऊन आशिष मोक्षी न्यावें
हीच असे मम भावना ॥ १ ॥
पाहुनी माते प्रेमळ मूर्ति, जगीं जन हे उद्धरती
उद्धरून आम्हां नेशिल ना ॥ २ ॥

७

दर्शन द्यावें संतोषीमाते, धीर मजसी राहिना ॥ धृ० ॥
आज जगाचे हाल होतसे, जर्जर झाले दुःखी यातना
तार आतां संतोषीमाते, येऊं दे तुज आमुची करुणा
पाहशी कां ग अन्त ? त्वरा करुनी पाव ना ॥ १ ॥
बुद्धिमत्ताहि गेली जगाची, अन् माणुसकीहि गेली त्याची
धर्म कर्महि भुलले सारे, पर्वा नच करती याची
सद्बुद्धि अन् ज्ञान देउनी, तूंच आम्हां तार ना ॥ २ ॥

जगन्माते, सन्तोषीमाते, अंतरीं मूर्ती तव ठसली ॥ धृ० ॥
चरणांवरती मस्तक नमुनी, पूजन करितो तुला स्मरुनी
तव आशीर्वाद मिळावा, आस नसे दुसरी ॥ १ ॥
तुझीच सेवा घडेल ज्याला, कमी कशाची नसेल त्याला
मजसी माते तारावें तूं, लोटुं नको तूं दुरी ॥ २ ॥

## आरती देवीची

दुर्गे दुर्घटभारी तुजविण संसारी । अनाथनाथे अंबे करुणा विस्तारी ॥
वारी वारी जन्ममरणातें वारी । हारी पडलो आतां संकट निवारी ॥
जयदेवी जयदेवी जय महिषासुरमथिनी । सुरवरईश्वरवरदे तारक संजिवनी ॥ धृ० ॥
त्रिभुवनीं भुवनीं पाहातां तुज ऐसी नाहीं । चारी श्रमले परंतु न बोलवे कांहीं ।
साही विवाद करतां पडलों प्रवाहीं । ते तूं भक्तलागी पावसि लवलाही ॥ १ ॥
प्रसन्नवदनें प्रसन्न होसी निजदासा । क्लेशांपासुन सोडी तोडी भवपाशा ।
अंबे तुजवांचून कोण पुरविल आशा । नरहरि तल्लिन झाला पदपंकजलेशा ॥ २ ॥

## श्रीअन्नपूर्णादेवीची आरती

श्रीअन्नपूर्णे देवी जय जय जगदंबे जननी । तुज ऐसी देवता नाहीं कोणी त्रिभुवनीं ॥धृ०॥
विप्र धनंजय त्याची भार्या सुलक्षणा होती । तीं दोघेंही अनन्यभावें तव भक्ती करिती ॥
तुझ्या प्रसादें झाली त्यांना पुत्राची प्राप्ती । सुखशांती लाभली देवी ऐसी तवकीर्ती ॥१॥ श्रीअन्न०॥
नरदेहाचे सार्थक होतें तव पूजन करूनी । नामस्मरणें सकलही जाती भवसागर तरुनी ॥
जीवन जरी हें भरलें आहे व्याधि-उपाधींनी । प्रसन्न परी तूं होतां सारें भय जातें पळुनी
॥ २ ॥ श्रीअन्न० ॥
छंद मनाला तुझा लागला मी करितो धांवा । धावुनी ये देवते पाहुनी मम भक्तिभावा ॥
अखंड शाश्वत प्रेमसुखाचा दे मजला ठेवा । जन्ममृत्युचा फेरा चुकवी ठाव पदीं द्यावा ॥३॥ श्रीअन्न०॥
तूं माझी माऊली जाण मी बालक तव तान्हा । क्षमस्व माते अपराधांची करूं नको गणना ॥
अन्नवस्त्र दे वैभव सारें सुखभोगहि नाना । मिलिंदमाधव करी प्रार्थना वंदुनी तव चरणां
॥ ४ ॥ श्रीअन्न० ॥

## ❀ आरती – जय जगदीश हरे ❀

ॐ जय जगदीश हरे, स्वामी जय जगदीश हरे ॥
भक्त जनोंके संकट क्षणमे दूर करे ॥ ॐ जय० ॥

जो ध्यावे फल पावे, दुःख विनशे मनका ॥ सुख संपत्ती घर आवे, कष्ट मिटे तनका ॥ ॐ जय० ॥ माता पिता तुम मेरे, शरण गहूं किसंकी ॥ तुम बिन और न दूजा, आस करूं जिसकी ॥ ॐ जय० ॥ तुम पूरण परमात्मा, तुम अंतर्यामी ॥ पार ब्रह्म परमेश्वर, तुम सबके स्वामी ॥ ॐ जय० ॥ तुम करुणाके सागर, तुम पालनकर्ता ॥ मै मूरख खलपापी, कृपा करो भर्ता ॥ ॐ जय० ॥ तुम हो एक अगोचर, सब के प्राण पती ॥ किस विधि मिलूं दयामय, तुमको मैं कुमती ॥ ॐ जय० ॥ दीन बंधु दुःख हर्ता, तुम ठाकुर मेरे ॥ अपने हाथ उठाओ, द्वार पडा तेरा ॥ ॐ जय० ॥ विषय विकार मिटाओ, पाप हरो देवा ॥ श्रद्धा भक्ति बढाओ, संतन की सेवा ॥ ॐ जय जगदीश हरे० ॥

---

• " श्रीसंतोषीमाता पूजा, व्रत, कथा माहात्म्य " •

या पोथीचे सर्व प्रकारचे हक्क प्रकाशक, एस्. एस्. तानवडे, ताडदेव बुक डेपो प्रकाशन, यांचे स्वाधीन आहेत.

---

: प्रकाशक :
एस्. एस्. तानवडे,
ताडदेव बुक डेपो, प्रकाशन,
ताडदेव, मुंबई ७.

: आवृत्ती चौथी :
: १९७७ :
ऑगस्ट

मुद्रक
परामाउंट लिथो ॲण्ड ऑफसेट वर्क्स
मुंबई – ११

मिलिंदमाघवकृत

अनुभवसिद्ध, शीघ्र फलदायी व्रत

# श्री लक्ष्मी माहात्म्य व्रत कथा व पूजाविधी

पुस्तके मराठी, गुजराती, हिंदी तिन्ही भाषेत मिळतात.

---

पत्ता : ताडदेव बुक डेपो, ५ सोनावाला बिल्डिंग, ताडदेव, मुंबई - ७

किंमत २० रुपये

Astro • Puja • Vastu

# FALIT JYOTISH AND VASTU SHASTRA CONSULTANT

## FOR ALL DHARMIK POOJA'S

SHRI GANESH PUJA

SHRI SATYANARAYAN PUJA

VASTU SHANTI

WEDDING | SAKHARPUDA | MUNJ

JANANA SHANTI | RUDRABHISHEK

SAPTASHATI PATH | HAVAN | ETC.

## HARI OM DHARMIK PUJA VIDHI KENDRA

**SANPADA OFFICE**
Office No. 8, 1st Floor, Shiva Triveni
Galleria CHS., Plot No. 13, Sector 8,
Sanpada, Navi Mumbai - 400705.

**GOVANDI OFFICE**
Shri Swaybhu Hanuman Mandir,
Deonar Mahanagarpalika Vasahat,
Govandi, Mumbai - 400043.

hariom astrologers
hariom astrologers
hariom_astrologers
hariomastrologers@gmail.com
www.hariomastrologers.com